जाहीर सुचना क्रमांक -2

ग्रामपंचायत विभाग जि.प. गोंदिया

**निविदा जाहिरात :-** जाक्र / जिपगो/ पंचा/कस/डे-27/जाहिरात/2025 **दिनांक**

**विषय :- जिल्हानिधी अंतर्गत बांधण्यात आलेले गोंदिया व आमगांव तालुक्यातील रिक्त असलेले दुकानगाळे भाडे तत्वावर वाटप करणेबाबत.**

**संदर्भ :-**

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961,मधील कलम 157 व 159,पोट कलम (1),खंड (ब) अन्वये.
2) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जि.प. गोंदिया यांचे पत्र क्र. जिपगो/सांबा/तांशा/ता-2/179 दिनांक 6/5/2024
3) जि.प. स्थायी समिती सभा दिनांक 18/6/2024, दिनांक 13/08/2025 इतिवृत्त मधील अटी व शर्ती
4) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जि.प. गोंदिया यांचे पत्र ZPGON-17024(11)/15/2024-ZPG-WORKS दिनांक 16/6/2025

सर्व जनतेच्या माहीतीसाठी या सुचनेद्वारे जाहिर करण्यात येते की, गोंदिया जिल्हयातील **गोंदिया व आमगांव** तालुक्यामध्ये जिल्हानिधी अंतर्गत बांधण्यात आलेले रिक्त असलेले दुकानगाळे वाटप करावयाचे आहे. स्थानिक, पात्र व ईच्छुक व्यवसायदार यांनी जिल्हा परिषद व संबधीत पंचायत समिती, कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा परिषदेच्या zpgondia.gov.in या **वेबसाईटवर** प्रकाशित केलेल्या अटी/शर्तीला अधिन राहुन ग्रामपंचायत विभाग, जि.प. गोंदिया स्तरावरुन दुकानगाळे मागणी अर्ज विकत घेऊन **दिनांक** 06/10/2025 **पर्यंत** ग्रामपंचायत विभाग, जि.प. गोंदिया येथे कार्यालयीन वेळेत **सकाळी** 11.00 वाजेपर्यंत सादर करावा. विलंबाने सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

**जिल्हा निधीमधुन बांधलेले दुकानगाळे**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | दुकानगाळयाचे ठिकाण | दुकानगाळे संख्या |
|---|---|---|---|
| 1 | गोंदिया | पंचायत समिती आवारात बांधलेले दुकानगाळे | 08 |
| | | गंगाबाई रुग्णालयाजवळील जि.प.प्रशासकिय इमारतीसमोर उजव्या बाजुला बांधलेले दुकानगाळे | 03 |
| 2 | आमगांव | प.स.आमगांव प्रा.आ.के. बनगांव च्या मागील बाजुस बांधलेले दुकानगाळे | 04 |

**दुकान गाळयाचे वाटपाबाबत सुधारीत (नियमावली) अटी व शर्ती :-**

1) जिल्हा निधी अंतर्गत तयार करण्यात आलेल्या दुकानगाळे करीता नियमानुसार अर्जदाराने विहीत नमुन्यात आणि आवश्यक दस्तऐवजांसोबत अर्ज सादर करावा.

2) अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्जासोबत "मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया" या नावाने रु.10,000/- (दहा हजार रूपये) चे धनादेश (डिमांड ड्राफ्ट) जोडणे बंधनकारक राहील. सदर अर्ज हे पंचायत विभाग जि.प. गोंदिया स्तरावरुन रु.100/- (शंभर रूपये) भरुन उपलब्ध करुन देण्यात येतील.

3) तालुका स्तरावरील दुकानगाळयाकरीता अर्जदार हा ज्या तालुक्याचा रहिवासी आहे, त्याला त्याच तालुक्यातील "दुकान गाळे मिळणेबाबत" अर्जात नमुद करावयाचे आहे. अर्जदाराने दुसऱ्या तालुक्यातील दुकानगाळे मिळणे बाबत अर्ज केल्यास तो अर्ज अमान्य करण्यात येईल.

4) दुकानगाळे मंजुर झालेल्या धारकास गाळे वाटप झाल्याचे दिनांकापासुन 07 दिवसांचे आत अनामत रक्कम भरणे बंधनकारक राहील, अन्यथा दुकानगाळयाचा ताबा व करारनामा रद्दबातल करण्यात येईल. दुकान गाळेधारकास अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही व सदर अनामत रक्कम जिल्हा परिषदेच्या विकास कामावर खर्च करण्यात येईल. अनामत रकमेची जिल्हा निधी मध्ये गुंतवणूक करण्यात येईल व दुकानगाळे परत करण्याच्या तारखेपासुन 06 महिन्यांनी अनामत रक्कम परत करण्याबाबतच्या अटीचे करारनामा सादर करणे बंधनकारक असेल.

5) जिल्हास्तरावर बांधकाम केलेले उर्वरीत 70% दुकानगाळे हे जिल्हयातील इच्छुक व्यवसायीकांना देण्यात येतील व तालुकास्तरावरील दुकानगाळे तालुक्यातील व्यवसायीकांना देण्यात येतील. दुकानगाळयांच्या 30% गाळे ज्या जागेवर बांधकाम केले आहे त्याच ठिकाणी यापूर्वी काही व्यवसायीक व्यवसाय करीत असतील तर त्या ठिकाणी बांधण्यात आलेले गाळे वाटप करतांना जास्त कालावधीमध्ये व्यवसाय करीत असणाऱ्या व्यवसायीकास प्राधान्य देण्यात येईल. (यासाठी जास्त कालावधीपासून व्यवसाय करीत असणाऱ्या व्यवसायीकास सबंधीत ग्रामपंचायत / नगर पंचायत यांचेकडून जुन्यात जुनी नमुना-8 ची पावती / कर पावती पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.)

6) सध्या गोंदिया जिल्हा परिषदे मार्फत बांधुन देण्यात आलेल्या दुकानगाळयावर कोणत्याही भाडेधारकाला मालकी हक्क प्रस्थापित करता येणार नाही. दुकानगाळे फक्त 11 महीन्यांच्या मुदतीकरीता देण्यात येतील व जि.प.च्या नियमावलीनुसार विहीत मुदतीत भाडे भरणाऱ्या व्यवसायदारांना रू.500/- च्या स्टॅम्प पेपरवर पुन्हा करारनामा करता येईल. दुकानगाळयाचा भाडे हे तालुकास्तरावर कमीत कमी दरमहा रु.3500/- (तीन हजार पाचशे रूपये) व जिल्हास्तरावर कमीत कमी दरमहा रु.4000/- (चार हजार रूपये) एवढा राहील. एका ठिकाणी उपलब्ध असलेल्या गाळयांपैकी जास्त अर्ज आल्यास इश्वर चिठ्ठीने गाळे वाटप करण्यात येईल. तसेच दुकानगाळयाचा ताबा घेण्यापुर्वी एक महिन्याचे अग्रीम भाडे भरणा करणे बंधनकारक राहील. सदर भाडयाचा भरणा केलेला नाही असे निदर्शनास आल्यास करारनामा रद्दबातल करण्यात येईल. दुकानगाळे धारकाने दुसऱ्या कोणत्याही व्यावसायीकाला गाळे भाडे तत्वावर देता येणार नाही किंवा हस्तांतरीत करता येणार नाही. त्यास स्वत: व्यवसाय करावा लागेल, अन्यथा दुकानगाळे रिकामे करावे लागेल. तीन महिन्यांचे वर भाडे थकीत राहील्यास दुकानगाळे परत घेण्यात येतील व भाडयाची रक्कम अनामत रक्कमेतुन कपात करुन ऊर्वरीत रक्कम परत करण्यात येईल, यावर दुकानगाळे धारकाची ऊजर तक्रार राहणार नाही.

7) भाडेधारकाला जि.प.ने ठरवुन दिलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहुन परवानाधारक नोटरी यांचेकडून करारनामा करून सादर करावा लागेल. भाडे थकीत असणाऱ्या व्यवसायदारांना पुन्हा करारनामा करता येणार नाही. त्यामुळे सदर व्यवसायीकास दुकानगाळयाचा हक्क सोडून दयावा लागेल. दुकानगाळयाचे भाडे दरमहा 5 तारखेच्या आत जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधी खात्यात किंवा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांच्या नावाने असलेला धनाकर्ष (डी.डी.) द्वारे भरण्यात येईल व भरणा केल्याची पावती पंचायत समिती स्तरावरुन जि.प.ला सादर करावी लागेल. विहीत मुदतीनंतर भाडयाची रक्कम भरण्यात आल्यास दरमहा 5% टक्के दराने विलंब आकार भरावा लागेल. दुकानगाळयांच्या भाडयात दर 3 वर्षानी 10% टक्के दरवाढ करण्यात येईल.

8) तालुकास्तरावरील सर्व गाळेधारकांकरीता एकमुस्त अनामत रक्कम रु.1,50,000/- (एक लक्ष पन्नास हजार रुपये) भरणा करावा लागेल, तसेच जिल्हास्तरावरील दुकानगाळयासाठी रु.2,50,000/- (दोन लक्ष पन्नास हजार रुपये) भरणा करावा लागेल. त्यानंतरच दुकानगाळयाचा ताबा देण्यात येईल. दुकानगाळयाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासुन त्याचे भाडे सुरु होईल व दुकान गाळयाचा संपुर्ण परिसर, प्रसाधनगृहे यांची स्वच्छता व साफसफाई राखणे याची संपुर्ण जबाबदारी गाळेधारकावर राहील. दुकानगाळे हे "जैसे थे" तत्वावर वितरीत करण्यात येईल. दुकानगाळयात कोणतीही नुकसानी व

तोडफोड करुन नुकसान केल्यास बांधकाम विभागातील तज्ञ अभियंता यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार रक्कम वसुल करण्यात येईल किंवा अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल.

9) दुकानगाळे रिकामे करावयाचा असल्यास कमीत कमी 6 महिन्याअगोदर लेखी सुचना संबधीत पंचायत समितीला/ जिल्हा परिषदेला देणे बंधनकारक राहील. ऐन वेळेवर दुकानगाळे रिकामे करण्याचे अर्ज सादर केल्यास 6 महिन्यांचे अतिरिक्त भाडे दंड स्वरुपात वसुल करण्यात येईल.

10) दुकानगाळयाच्या सध्याच्या बांधकामात जि.प.च्या परवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

11) दुकानगाळयामध्ये जि.प.च्या परवानगीने भाडेधारकास स्वखर्चाने विद्युत मिटर व पाणी मिटर ची जोडणी करता येईल, परंतू याच कारणांमुळे दुकानगाळे धारकास दुकानावर मालकी हक्क स्थापीत करता येणार नाही. पाणी पटटी कर व विद्युत कराचा भरणा गाळेधारकास स्वत:करावा लागेल.

12) भाडेधारकास नियमानुसार जामीन दयावा लागेल. त्याच्या अटी व शर्ती विहीत केल्या प्रमाणे राहतील.

13) दुकानगाळयाचा वापर हा शासनाने ठरवून दिलेल्या व्यवसायासाठी करावा लागेल, याची दक्षता गाळेधारकाने घेणे बंधनकारक राहील.

14) दुकानगाळे वाटप वा रद्द करण्याचे अंतिम अधिकार दुकानगाळे वाटप समितीला राहतील.

15) दुकानगाळे प्रकरणातील दाव्याचे अपीलासाठी मा.जिल्हा न्यायालय, गोंदिया हे कार्यक्षेत्र राहील.

वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास कोणतीही सुचना न देता दुकानगाळे रिकामे करुन घेण्यात येईल.

( एम. एम. वासनिक )
उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रा.प. )
तथा सचिव दुकानगाळे समिती
जिल्हा परिषद, गोंदिया

( लायकराम भेंडारकर )
अध्यक्ष, दुकानगाळे समिती
तथा अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया